# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 250 /2020 दिनांक: 23 / 04/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 216 /2020 दिनांक 19.04.2020

**( बँकेचे व्यवहार सकाळी 09.00 वा. पासून ते दुपारी 02.00 वाजेपर्यंत सुरु ठेवण्याबाबत )**

***आदेश***

**ज्याअर्थी,** शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमुळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/-कावि 190 /2020 दिनांक 08.04.2020 नुसार अकोला जिल्हयातील सर्व बँक सकाळी 08.00 ते दु. 12.00 या कालावधीत सुरु ठेवण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. **आणि**

**ज्याअर्थी,** या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/-कावि 216 /2020 दिनांक 19.04.2020 नुसार अकोला जिल्हयात दिनांक 03.05.2020 रोजीचे मध्यरात्रीपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे.**आणि**

**त्याअर्थी, मी, जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अकोला जिल्हयात कोरोना विषाणूचा संसर्ग झालेले रुग्ण आढळून आल्यामुळे जिल्हयातील बहुतांश बँकेमध्ये नागरीकांची गर्दी होतांना आढळून येत असल्यामुळे , कोरोना विषाणूचा फैलाव व प्रादुर्भाव होवू नये या करिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत माझी खात्री झाली आहे. त्या अनुषंगाने संचारबंदीचे कालावधीमध्ये नागरीकांचे कामे सुरळीतपणे सुरु राहण्याकरिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

1. **अकोला जिल्हयातील सर्व बँकेचे व्यवहार.**
2. **अकोला जिल्हयातील बिगर बँकींग वित्तीय संस्था (NBFCs), गृहनिर्माण वित्त कंपन्या (HFCs), आणि सूक्ष्म वित्त संस्था ( NBFC-MFIs) यांचेकडील व्यवहार.**
3. **अकोला जिल्हयातील सहकारी पतसंस्था यांचेकडील व्यवहार.**

**दिनांक 25.04.2020 रोजीचे सकाळी 09.00 ते दुपारी 02.00 या कालावधीत पुढील आदेशापर्यंत सुरु राहतील.**

सर्व बॅक व्यवस्थापक, तसेच बिगर बँकींग वित्तीय संस्थेचे व पतसंस्थेचे व्यवस्थापक यांना याद्वारे आदेशित करण्यात येते की, ( Basic Banking) प्रत्येक बँकेद्वारे पैसे काढणे, पैसे टाकणे, पैसे पाठविणे तसेच स्वताच्या खात्यामधील किमान रक्कम तपासणे व काढणे इत्यादी सेवा प्रत्येक ग्राहकाला पुरविण्यात याव्यात. तसेच या व्यतिरिक्त



NitinN 349

कोणत्याही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येवू नये. या सुविधा उपलब्ध करुन देतांना शासनाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे तंतोतंत पालन करावे. जसे सोशल डिस्टंसिंग, बँकेमध्ये हात स्वच्छ धुण्याकरिता पाणी, *हॅन्डवाश*, सॅनिटायझर इत्यादी साहीत्य ठेवावे. सदरची जवाबदारी ही बँक व्यवस्थापकाची राहील.

उपरोक्त नमूद केलेल्या आदेशाचे जो कोणी व्यक्ती अवज्ञा करेल अशी व्यक्ती ही **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल व त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 24 **एप्रिल** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला.
3. जिल्हा पोलीस अधिक्षक,अकोला यांनी उपविभागीय अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
4. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता
5. सह जिल्हा निबंधक सहकारी संस्था, अकोला
6. मॅनेजर लिड बँक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सर्व बॅक व्यवस्थापक यांना आपले स्तरावरुन सूचित करावे.
7. अधीष्ठाता शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला.
8. जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय अकोला.
9. उपविभागीय अधिकारी, -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
10. तहसिलदार ------------------------------------------ सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
11. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर बातमी जास्त खपाच्या वृत्तपत्रामधून विनामुल्य प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याकरिता.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
**जिल्हादंडाधिकारी,अकोला**